सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नागपूर-४४०००१

ई-मेल : jd.nagpur@mahakosh.in
दुरध्वनी क्र. ०७१२- २५६००२१

क्र. ससंलेवको/वेपप/नागपूर/एकस्तर वे.श्रे./२०२४/ 317
दिनांक : 07 FEB 2024

प्रति,

वरिष्ठ कोषागार अधिकारी,
नागपूर.
कोषागार अधिकारी,
भंडारा / गोंदिया / गडचिरोली / वर्धा / चंद्रपूर

**विषय : शासन अधिसूचना दि.०३.०२.२०२३ नूसार एकस्तर वेतनश्रेणीतील सुधारीत वेतननिश्चितीबद्दल मार्गदर्शन मिळणेबाबत.**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.ससंले/वेपप/नागपूर/२०२३/२०८७, दिनांक २०.०९.२०२३
२) संचालनालयाचे पत्र क्र.संलेको-२०२३/वेपप/वेतन उंचावणे/वेतनवाढ/४/३/२०१८, दिनांक ०१.०१.२०२४

उपरोक्त विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भीय १ चे पत्रान्वये शासन अधिसुचना दिनांक ०३.०२.२०२३ नूसार एकस्तर वेतनश्रेणीतील सुधारीत वेतननिश्चितीबद्दल संचालनालयास मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने संदर्भीय २ चे पत्रान्वये संचालनालयाचे मार्गदर्शन प्राप्त झाले असून (प्रत संलग्न) **"दिनांक ०१.०१.२००६ नंतर सरळसेवेने नक्षलग्रस्त भागात नियुक्त कर्मचाऱ्यास एकस्तर वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करतांना जोडपत्र-३ नूसार वेतननिश्चिती अनुज्ञेय नाही."** असे कळविले आहे.

करीता सदर बाब अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तरी आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून कोषागारास/उपकोषागारास प्राप्त वेतन/पुरवणी वेतन देयके उपरोक्त निर्देशानूसार बरोबर असल्याची खात्री करुनच देयके पारीत करण्यात यावी. जेणेकरुन भविष्यात अधिकारी/कर्मचारी यांची सेवानिवृत्तीच्या वेळी चुकीच्या वेतननिश्चितीमुळे अतिप्रदान वसूली तसेच न्यायालयीन प्रकरण उद्भवणार नाही.

[ ग.भा.हिरुळकर ]
सहसंचालक (प्र.)
लेखा व कोषागारे, नागपूर

प्रत : मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
संचालनालय लेखा व कोषागारे
वेतन पडताळणी पथक
कस्तुरी इमारत, तळमजला, पेट्रोलियम हाऊस समोर, जे. टा. मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२१
E-mail : aopvdat.mum-mh@nic.in
दुरध्वनी- ०२२-२२८८०१०६/२२८८०१०७/२२८८०११७

दिनांक :- .१२.२०२३

क्र.संलेको-२०२३/वेपप/वेतन उंचावणे/वेतनवाढ/५/३/२१८

प्रति,
सहसंचालक,
लेखा व कोषागारे,
नागपूर.

**विषय :** शासन अधिसूचना दि.०३.०२.२०२३ नुसार एकस्तर वेतनश्रेणीतील सुधारित वेतन निश्चितीबद्दल मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्र.ससंले/वेपप/नागपूर/२०२३/२०८७ दि.२०.०९.२०२३

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने विचारणा करण्यात आल्यानुसार कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएफ २०००/प्र.क्र.३/बारा दिनांक ०६/०८/२००२ मधील मुद्दा क्र. ३ मधील ७ मध्ये "आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट 'अ' ते 'ड' मधील सर्व पदधारकांना संबंधित कर्मचारी/ अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा लाभ देण्यात यावा" अशी तरतूद आहे. **शासन निर्णयातील सदर तरतुद स्वयंस्पष्ट असुन आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सदर वेतनश्रेणीचा लाभ हा पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाचा असतो.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपुर १२१०/प्र.क्र.१२४(भाग-१)/सेवा-९ दि.९ फेब्रुवारी २०१६ दि.९.२.२०१६ मधील अट (छ) नुसार तात्पुरत्या अथवा तदर्थ स्वरुपात पदोन्नत ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना वेतन उंचावून देण्याची मागणी करता येणार नाही. त्यामुळे **दि.०१/०१/२००६ नंतर सरळसेवेने नक्षलग्रस्त भागात नियुक्त कर्मचाऱ्यास एकस्तर वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करताना जोडपत्र ३ नुसार वेतन निश्चिती अनुज्ञेय नाही.**

( दिपक शिंदे )
उपसंचालक
लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**
सहसंचालक, लेखा व कोषागारे, वेतन पडताळणी पथक, कोकण/नाशिक/पुणे/छत्रपती संभाजीनगर/अमरावती


C:\Users\admin\Desktop\GENERAL NOTING २०२३.doc